लोकमत

# भारतीय सैन्यात जायचेय? करा २२ मार्चपर्यंत ऑनलाइन अर्ज !

## आठवी, दहावी, बारावीसह आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांना संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** दहावी, बारावीनंतर अनेक तरुणांना सैन्यात भरती होण्याचे वेध लागतात. अनेकजण त्यासाठी धडपडत असतात. भारतीय सैन्यदलात विविध पदांसाठी २२ मार्चपर्यंत ऑनलाइन अर्ज मागवण्यात आले आहेत.

भारतीय सैन्य दलात २०२४-२५ साठी अग्निवीर पदाची भरती दोन टप्प्यांत होणार आहे. पहिल्या टप्प्यात संगणकावर (सीईई) परीक्षा होईल, तर दुसरा टप्पा प्रत्यक्ष भरती मेळावा आहे. ऑनलाइन परीक्षा (सीईई) साठी अर्ज भरण्याची प्रक्रिया १३ फेब्रुवारीपासून सुरू झाली आहे. अंतिम मुदत २२ मार्चपर्यंत आहे. याबाबतची अधिक माहिती joinindianarmy.nic.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. सैन्य भरतीसाठी इच्छुक असणाऱ्या तरुणांसाठी सैनिक भरती कार्यालयाने संधी दिली आहे.

उमेदवारांना वरील वेबसाईटवर लॉग इन करून स्वतःचे प्रोफाईल बनवावे लागणार आहे. नोंदणी कशी करावी आणि ऑनलाईन परीक्षेसाठी कसे उपस्थित राहावे याचे व्हिडीओदेखील वेबसाईटवर उपलब्ध आहेत.



### संपूर्ण माहिती या वेबसाईटवर

सैन्य भरतीची सर्व माहिती तसेच अटी-शर्तीची माहिती www.joinindianarmy.nic.in/ या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

### निवडीचे दोन टप्पे

**ऑनलाइन लेखी परीक्षा**

संगणकावर आधारित लेखी परीक्षा (सीईई) पहिल्या टप्प्यात असणार आहे. संपूर्ण परीक्षा व निकाल ही प्रक्रिया ऑनलाइनच होणार आहे.

**प्रत्यक्ष भरती**

ऑनलाइन परीक्षेनंतरचा दुसरा टप्पा हा प्रत्यक्ष भरती प्रक्रियेचा आहे. दोन्हीविषयी वेबसाईटवर माहिती आहे.

### अर्ज कसा कराल?

ऑनलाइनसाठी वेबसाईटवर लॉगईन करून प्रोफाईल करावे. अर्जदाराच्या डिजिलॉकर खात्यातून वैयक्तिक तपशील प्राप्त करून घेतला जाईल. ऑनलाइन परीक्षेसाठी २५० रुपये शुल्क आहे. वेबसाईटवर सर्व माहिती दिली आहे.



### कोणकोणती पदे?

**अग्निवीर जनरल ड्यूटी**

किमान ४५ टक्के गुणांसह दहावी उत्तीर्ण आवश्यक आहे. तसेच वय साडेसतरा ते २१ वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे.

**टेक्निकल**

बारावी शास्त्र शाखा भौतिक, रसायन आणि गणित, इंग्लिश या विषयांसह ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण आवश्यक आहे. वय साडेसतरा ते २१ वर्षे आहे.

**लिपिक/स्टोअर कीपर**

बारावी परीक्षा कोणत्याही शाखेत ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वय साडेसतरा ते २१ वर्षे आहे.

**ट्रेड्समेन**

या पदासाठी आठवी किंवा दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वय साडेसतरा ते २१ वर्षे आवश्यक आहे. ही पात्रता असणाऱ्यांनीच अर्ज करावा.

### आठवी, दहावी पास आणि आयटीआय झालेल्यांनाही संधी

अग्निवीरसाठी वेगवेगळ्या पदांसाठी आठवी, दहावी आणि आयटीआयमधील यादीत दिलेले पद उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्यामुळे ही एक मोठी संधी आली आहे.

mahasarkarinaukri.com